सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

विभागीय आयुक्त यांचे कार्यालय नाशिकरोड, नाशिक

दुरध्वनी क्र.०२५३-२४६२४०१ सामान्य प्रशासन विभाग crunsk-divcom@mah.gov.in

क्र. अभिलेख-२०२६/साशा.५/जाहीर नोटीस जा.क्र. ०२ दि.१५/०९/२०२६
दिनांकात स्वाक्षरी नमूद आहे.

**विषयः- विभागीय आयुक्त कार्यालयातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे पेस्ट कंट्रोल व वाळवी फवारणी व नियोजन हॉलमध्ये दरमहा उंदिर व किटकनाशक फवारणी करीता देखभाल करार करणेबाबबत सन २०२६-२७**

## जाहीर नोटीस

विभागीय आयुक्त कार्यालयातील इमारतीमधील विभागीय आयुक्त यांचे दालन, सर्व कार्यालय प्रमुख यांचे दालन, इतर अधिकारी यांचे दालन,नियोजन सभागृह,समिती कक्ष,अभिलेख कक्ष तसेच कार्यालयातील तिन्ही मजल्यावरील एकूण २० शाखा, कार्यालयातील कॅन्टीन, इमारतीमधील सर्व स्वच्छतागृह अशा सर्व ठिकाणी **वर्षातुन एकदा** पेस्ट कंट्रोल (Pest Control) व वाळवी नाशक फवारणी तसेच **दरमहा** उंदिर व किटकनाशक फवारणी करुन घेणेकामी या प्रसिध्दीपत्रकान्वये इच्छुक पेस्ट कंट्रोल सेवपुरवठादार यांचेकडून सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**या करीता इच्छुक पुरवठादार यांचे कडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून आपली दरपत्रके दि. २४/०९/२०२६ पावेतो मा.अपर आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड यांचे कडेस कार्यालयीन वेळेत सादर करावीत.**

**कामाचे स्वरूप कामाचे तपशील (Scope of Work / Specifications**

सदर कामाचा तपशील (Scope of Work / Specifications) मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाचे तपशील (Specifications) | दरपत्रक सर्व करासहीत वार्षिक |
|---|---|---|---|
| १. | **सर्वसाधारण कीटक नियंत्रण (General Pest Control and Anti-Termite Treatment))(वर्षातून एकदा)(Lumsum)** | कार्यालयीन इमारतीतील सर्व कार्यालयीन कक्ष, अभिलेख कक्ष (Record Room), सभागृह, जिने, व्हरांडा, स्वच्छतागृहे, स्टोअर रूम तसेच इतर सर्व अंतर्गत भागांमध्ये झुरळे, मुंग्या, माशा, डास, कोळी, सिल्व्हर फिश, पाली, बेडबग्स व इतर कीटकांच्या नियंत्रणासाठी शासनमान्य कीटकनाशकांचा वापर करून Gel Treatment, Residual Spray व आवश्यकतेनुसार Fogging करणे.<br>कार्यालयातील लाकडी फर्निचर, कपाटे, दारे, खिडक्या, रेकॉर्ड रूम, लाकडी संरचना तसेच वाळवीचा प्रादुर्भाव आढळणाऱ्या भागांवर शासनमान्य Anti-Termite Chemical द्वारे आवश्यक उपचार करणे. | |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| २ | उंदीर नियंत्रण (Rodent Control) प्रतिबंधक उपचार (दरमहा एकदा याप्रमाणे एका वर्षात बारा वेळा उपचार करणे.) (Lumsum) | कार्यालयीन इमारतीच्या अंतर्गत व बाह्य परिसरात उंदरांच्या नियंत्रणासाठी शासनमान्य Rodenticide चा वापर करून प्रभावी नियंत्रण करणे तसेच आवश्यकतेनुसार Bait चे पुनर्भरण (Refilling) करणे | |
| | | एकुण | |

## अटी व शर्ती

१. दरामध्ये सर्व कर, वाहतूक, मजुरी, साहित्य, उपकरणे व इतर सर्व खर्च समाविष्ट असावेत.

२. वापरण्यात येणारी सर्व रसायने शासनमान्य व वैध मुदतीतील असावीत.

३. काम कार्यालयीन कामकाजात अडथळा न आणता संबंधित अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार पूर्ण करावे.

४. काम पूर्ण झाल्यानंतर सेवा अहवाल (Service Report) सादर करणे आवश्यक राहील.

५. काम पूर्ण झाल्यानंतर किमान ०३ महिन्यांची विनामूल्य Follow-up Service / Warranty देणे आवश्यक राहील.

६. काम समाधानकारक झाल्यानंतर व सक्षम अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानंतरच देयक अदा करण्यात येईल.

७. कोणतेही अथवा सर्व दरपत्रके स्वीकारणे किंवा कोणतेही कारण न देता नाकारणे याचा अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याकडे राहील.

८. संबंधित व्यवसायाचा वैध परवाना/नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९. वैध GST नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०. काम प्रशिक्षित व अनुभवी कर्मचाऱ्यांमार्फत कार्यालयीन कामकाजात अडथळा येणार नाही अशा पद्धतीने करण्यात यावे. काम करतेवेळी कार्यालयीन अभिलेख, फर्निचर, संगणक, विद्युत उपकरणे व इतर मालमत्तेचे कोणतेही नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

११. काम पूर्ण झाल्यानंतर किमान ०३ (तीन) महिन्यांच्या कालावधीत संबंधित ठिकाणी पुन्हा किटक, उंदीर किंवा वाळवीचा प्रादुर्भाव झाल्यास कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारता आवश्यक पुन्हा फवारणी करणे बंधनकारक राहील.

१२. अटी व शर्ती पुर्ण करुन सेवापुरवठादारांनी भरलेली एकत्रित एकुण रक्कम कमीत कमी असेल अशा सेवापुरवठादाराची निवड करण्यात येईल.

(अरविंद लोखंडे)
अपर आयुक्त (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक

Scanned with OKEN Scanner